"गृह विभाग-मागणी क्रमांक बी-१, २०५५, पोलीस, (०२) शहर पोलीस, (०२)(०१) शहर पोलीस-आस्थापना (दत्तमत) (अनिवार्य) (२०५५ ००९७), २७, लहान बांधकामे" या लेखाशीर्षाखाली सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात मंजूर अनुदानापैकी ७० टक्के निधी वितरित करणे व खर्च करणे यांकरिता मंजूरी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांक : दुरुस्ती-१११७/प्र.क्र.५७१/दोन/पोल-७.

मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०७ डिसेंबर, २०१७.

वाचा :- १) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८.०४.२०१७.
२) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दिनांक ३०.०६.२०१७.

शासन निर्णय.-

सन २०१७-१८ या वित्तीय वर्षाच्या अर्थसंकल्पात "गृह विभाग-मागणी क्रमांक बी-१, २०५५, पोलीस, (०२) शहर पोलीस, (०२) (०१) शहर पोलीस-आस्थापना (दत्तमत) (अनिवार्य) (२०५५ ००९७), २७, लहान बांधकामे" या लेखाशीर्षाखाली एकूण ₹ १५ लक्ष (रुपये पंधरा लक्ष फक्त) इतके अनुदान मंजूर करण्यात आले आहे. त्यापैकी ७० टक्के निधी अर्थात ₹ १०.५० लक्ष (रुपये दहा लक्ष पन्नास हजार फक्त) वितरित व खर्च करणे यांकरिता, याद्वारे, मंजूरी देण्यात येत आहे.

२. उक्त खर्च हा, "गृह विभाग-मागणी क्रमांक बी-१, २०५५, पोलीस, (०२) शहर पोलीस, (०२) (०१) शहर पोलीस-आस्थापना (दत्तमत) (अनिवार्य) (२०५५ ००९७), २७, लहान बांधकामे" या लेखाशीर्षाखाली चालू (सन २०१७-१८) वित्तीय वर्षात उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

३. उक्त रक्कम अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई, येथून काढण्यासाठी पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मुंबई, यांनी उक्त रक्कम पुढीलप्रमाणे खर्च करावी:-

१) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मुंबई, यांनी विविध कामांचा प्राथम्य ठरवून उक्त निधी खर्च करावा.

२) पोलीस दलाच्या निवासी व अनिवासी इमारतींच्या दुरूस्तीसाठी पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचेमार्फत प्रत्यक्ष काम करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागास उपलब्ध करुन देण्यात यावा.

३) सदर कामे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत विहित वेळेत करण्यात यावीत.

४) पोलीस दलाच्या इमारतींची दुरूस्तीची कामे केल्यानंतर दुरुस्ती केलेल्या इमारतींच्या आयुर्मानात निश्चित वाढ होईल व त्या दीर्घकाळ वापरात येतील याची खात्री करण्यात यावी.

५) प्रत्येक प्रस्तावास सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक मान्यता घ्यावी.

६) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी कामांची आवश्यकता, प्रत्यक्ष निधीची उपलब्धता, गुणवत्ता, प्रगती इत्यादीबाबत आवश्यकतेनुसार सर्वसाधारण आढावा नियमितपणे घ्यावा.

७) या कामांसाठी खर्च करण्यात आलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र वेळोवेळी शासनास सादर करावे.

५. "लहान बांधकामे" ही नवीन योजना नाही. तसेच, या योजनेचे स्वरुप व व्याप्ती यामध्ये बदल झालेला नाही. "गृह विभाग-मागणी क्रमांक बी-१, २०५५, पोलीस, (०२) शहर पोलीस, (०२) (०१) शहर पोलीस-आस्थापना (दत्तमत) (अनिवार्य) (२०५५ ००९७), २७, लहान बांधकामे" या लेखाशीर्षाखाली प्रत्येक वित्तीय वर्षात निधी उपलब्ध करुन देण्यात येत असतो.

६. हा शासन निर्णय, शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/ अर्थ-३, दिनांक ३०.०६.२०१७, अनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१७१२०७१७१२३२५९२९ असा आहे. हा शासन निर्णय डीजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Swapnil Gopal Borse

Digitally signed by Swapnil Gopal Borse
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=66835707253ff77ef0e333eb3ad582f9b876d443b2654088832e43dcad21c52a, cn=Swapnil Gopal Borse
Date: 2017.12.07 17:15:32 +05'30'

(स्वप्नील गोपाल बोरसे)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.

२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.

३) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा /विधानपरिषद, यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.

४) मा. गृह राज्यमंत्री (शहरे/ ग्रामीण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

५) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई.

६) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मुंबई.

प्रत-

१) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) -१/२, महाराष्ट्र, मुंबई/ नागपूर.
४) महालेखापाल (लेखापरीक्षा)-१/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
५) अवर सचिव (अर्थ-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) कार्यासन अधिकारी (व्यय-७), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) निवड फाईल, पोल-७.